PNA/HSG/467/68

# श्रीराम ज्योती सहकारी गृहरचना संस्था. मर्यादित.

२०/४८, गुळवणी महाराज रस्ता, एरंडवणे, पुणे - ४११००४

दिनांक : ०६/१०/२०२५

## वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत

प्रति,

सन्माननीय सभासद,

आपल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी पाठवलेल्या नोटीसनुसार संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी " राधिका" बंगला, पटवर्धन बाग येथे पार पडली. सभा सकाळी ठीक १०.३० वाजता सुरू झाली परंतु गणसंख्ये अभावी सभा तहकूब करून अर्ध्या तासाने ठीक ११.०० वाजता सदर सभेचे कामकाज सुरू करण्यात आले.सभेसाठी संस्थेचे एकूण १८ सभासद उपस्थित होते. संस्थेचे सचिव श्री. गोपाळ कुलकर्णी यांनी विषयपत्रिके प्रमाणे संस्थेचे अध्यक्ष श्री. शशांक गाजरे ह्यांना सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली त्यानुसार अध्यक्ष श्री. शशांक गाजरे ह्यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून सभेच्या कामकाजाला सुरवात केली.

विषयपत्रिकेप्रमाणे **विषय क्र २** नुसार दि. २९/९/२०२४ रोजी झालेली वार्षिक सर्वसाधारण सभा, दि. १६/२/२०२५ रोजी व दि. १७/८/२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृतांतातांच्या मान्यतेचा प्रस्ताव मांडला. तिन्ही सभांचे इतिवृतांत सर्व सभासदांना हार्ड कॉपी तसेच ईमेल व सोसायटीच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवल्याचे अध्यक्ष शशांक गाजरे यांनी सांगितले तसेच सोसायटीच्या वेबसाईटवर देखील अपलोड केल्याचे सांगितले आणि उपस्थित सर्व सभासदांना हात उंचावून प्रस्तावाला मान्यता देण्याचे आवाहन केले त्यानुसार २ सभासद सोडून उर्वरित सर्व सभासदांनी हात उंचावून प्रस्तावाला अनुमोदन दिले. त्यानंतर हा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला आहे असे अध्यक्षांनी जाहीर केले.

दि. २९/९/२०२४ रोजी झालेली वार्षिक सर्वसाधारण सभा, दि. १६/२/२०२५ व दि. १७/८/२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या मान्यतेचा ठराव बहुमताने मंजूर.

सूचक: गोपाळ कुलकर्णी अनुमोदक: किशोर कुलकर्णी

**विषय क्र ३**: आर्थिक वर्ष २०२४ - २०२५ चा लेखा परीक्षण अहवाल (Audit Report) सभेच्या नोटीस बरोबर सर्व सभासदांना पाठविण्यात आला होता. लेखा परीक्षण अहवालावर सविस्तर चर्चा झाली. सभासद सौ. उज्वला प्रधान यांनी किती सभासदांची देखभाल वर्गणी बाकी आहे असं विचारलं त्यावर सचिव श्री. गोपाळ कुलकर्णी यांनी सांगितलं की दुकान क्र ५ चे सभासद श्री. भैरोराम चौधरी यांनी गेली तीन वर्षे व चालू वर्षाची म्हणजेच २०२५ - २६ सह एकूण ४ वर्षांची देखभाल वर्गणी ( मेंटेनन्स चार्जेस) दिलेले नाहीत त्यावर सभासद श्री शेखर दाते यांनी सदर सभासदाला वकिलांमार्फत कायदेशीर नोटीस देऊन त्यांची देखभाल वर्गणी दंडासहित वसूल करावी अन्यथा त्यांच्या दुकानाला टाळं लावावं अशी सूचना केली तसेच सभासद सौ स्वाती लिमये यांची ऑक्टोबर 2024 ते मार्च 2025 ची देखभाल वर्गणी बाकी असून त्यांनी ती दोन दिवसात दंडासहित जमा करावी असेही ठरवण्यात आले तसेच श्रीमती आरती

वाघ फ्लॅट नंबर 26 यांच्याकडून 2024 25 व चालू वर्ष 2025 2026 या दोन वर्षांची देखभाल वर्गणी व पार्किंग चार्जेस बाकी असल्याचे सचिव श्री गोपाळ कुलकर्णी यांनी सांगितले त्यावर सभासदांनी श्रीमती आरती वाघ यांना 31 मार्च 2025 पर्यंतची मुदत द्यावी असे सुचविण्यात आले. सदर लेखापरीक्षण अहवाल मंजूर करावा असे आव्हान अध्यक्ष शशांक गाजरे यांनी केले त्यानुसार उपस्थित दोन सोडून इतर सर्व सभासदांनी सदर ठरावाला हात उंचावून मान्यता दिली.

त्यानंतर आर्थिक वर्ष 2024 ते 2025 चा लेखा परीक्षण अहवाल ऑडिट रिपोर्ट हा मान्य झाल्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

सूचक : सौ उज्वला प्रधान अनुमोदक: सौ.उज्वला कुलकर्णी

**विषय क्रमांक ४**: आर्थिक वर्ष 2025 ते 2026 साठी प्रमाणित लेखापरीक्षकांची नेमणूक करणे

साल 2024 ते 2025 चे लेखापरीक्षण सीए आदित्य पाठक यांनी अतिशय व्यवस्थित पद्धतीने केले आणि त्यांच्या उत्तम कामाच्या पद्धतीमुळे संस्थेला यावर्षी पहिल्यांदाच ऑडिट वर्ग 'अ' मिळाला असून त्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री शशांक गाजरे यांनी सर्व सभासदांचे अभिनंदन केले व पुन्हा एकदा साल 2025 ते 2026 चे लेखापरीक्षण करण्यासाठी सीए आदित्य पाठक यांची नेमणूक करावी असा ठराव मांडला व त्या ठरावाला दोन सभासद सोडून उर्वरित सर्व सभासदांनी हात उंचावून मान्यता दिली.

आर्थिक वर्ष 2025 2026 साठी लेखा परीक्षक म्हणून सीए श्री आदित्य पाठक यांची नेमणूक करण्याचा ठराव बहुमताने मंजूर.

सूचक: किशोर कुलकर्णी अनुमोदक: शेखर दाते

**विषय क्रमांक ५**: खालील सभासदांना संस्थेचे सभासदत्व देण्याबाबत संस्थेच्या व्यवस्थापन समितीने केलेल्या ठरावांना मान्यता देणे.

वरील विषयानुसार संस्थेच्या व्यवस्थापन समितीने संस्थेच्या वकिलांनी दिलेल्या अहवालानुसार १. श्री मिहीर मोहन छत्रे, २. श्री किशोर गोखले, ३. श्री अभिजीत फडके व श्री राहुल गणबोटे यांना संस्थेचे सभासदत्व देण्याबाबत ठराव ठराव केले आहेत त्यातील श्री राहुल गणबोटे यांनी काही कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असून सदर कागदपत्रांची पूर्तता न करता ही त्यांना संस्थेचे सभासदत्व देण्यात आले आहे त्यामुळे संस्थेने त्यांना त्यांची अपूर्ण कागदपत्रे पूर्ण करून देण्यासाठी एक पत्र द्यावे अशी सूचना सभासद श्री शेखर दाते यांनी केली व त्यास उपस्थित सर्व सभासदांनी मान्यता दिली. सदर सभासदांना सभासदत्व देण्याचा संस्थेच्या व्यवस्थापन समितीने केलेल्या ठरावांना मान्यता देण्याचा ठराव मंजूर करावा असे आव्हान अध्यक्ष शशांक गाजरे यांनी केले त्यानुसार उपस्थित दोन सोडून इतर सर्व सभासदांनी सदर ठरावाला हात उंचावून मान्यता दिली.

वर उल्लेख केलेल्या सभासदांना सभासदत्व देण्याचा संस्थेच्या व्यवस्थापन समितीने केलेल्या ठरावांना मान्यता देण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

सूचक : श्रीमती अंजली करमरकर अनुमोदक : श्रीमती सुचेता जोशी

**विषय क्रमांक ६**: संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकसनासाठी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी साधारण रुपये तीस हजार एवढा खर्च झाला असून सदर खर्चाला उपस्थित सर्व सभासदांनी मान्यता द्यावी असे आव्हान अध्यक्ष शशांक गाजरे यांनी केले त्यानुसार उपस्थित दोन सोडून इतर सर्व सभासदांनी सदर ठरावाला हात उंचावून मान्यता दिली.

संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकसनासाठी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या खर्चाला मान्यता देण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

सूचक: श्री.अभिजीत फडके अनुमोदक: सौ अनुजा फडके

**विषय क्रमांक ७:** संस्थेचे पीएमसी आर्किटेक्ट हर्षल कवडीकर व कायदेशीर सल्लागार एडवोकेट किरण काबरा यांच्या मानधनास मंजुरी देणे.

संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकसनासाठी संस्थेचे पीएमसी आर्किटेक्ट हर्षल कवडीकर व कायदेशीर सल्लागार एडवोकेट किरण काबरा यांनी केलेल्या कामाच्या टप्प्यानुसार मोबदला देण्याचा ठराव अध्यक्ष शशांक गाजरे यांनी मांडला व उपस्थित सर्व सभासदांना तो मंजूर करण्याचे आवाहन केले. त्यानुसार उपस्थित दोन सोडून इतर सर्व सभासदांनी ठरावाला हात उंचावून मान्यता दिली.

संस्थेचे पीएमसी आर्किटेक हर्षल कवडीकर व कायदेशीर सल्लागार एडवोकेट किरण काबरा यांना वर्क शेड्युल प्रमाणे मोबदला देण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

सूचक : श्री शेखर दाते अनुमोदक: श्री रवी मुल्लूर.

**विषय क्रमांक ८**: माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

श्री राहुल गणबोटे व श्री सुरेश लिमये यांनी त्यांच्या सदनिकेमध्ये पिण्याचे पाणी येत नसल्याच्या तक्रारींची अनेक पत्रं संस्थेची व्यवस्थापन समिती माननीय उपनिबंधक सहकारी संस्था तसेच मा.आयुक्त पुणे महानगरपालिका यांना वेळोवेळी दिली आहेत. यासंदर्भात पुणे महानगरपालिकेच्या एसएनडीटी पाणीपुरवठा विभागातर्फे सोसायटीमध्ये येणाऱ्या पाण्याचे प्रेशर तपासले असून सदर प्रेशर योग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे तसेच महानगरपालिकेची जबाबदारी सोसायटीच्या खालच्या टाकीमध्ये पाणीपुरवठा करण्याची असून वरील मजल्यावर पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे तरीसुद्धा हे दोन्ही सभासद वारंवार

या विषयात सोसायटीला पत्र देऊन सोसायटीच्या व्यवस्थापन समिती सदस्यांना नाहक मानसिक त्रास देत असल्याचं मत उपस्थित अनेक सभासदांनी व्यक्त केलं तसेच वरील मजल्यावर राहणाऱ्या सभासदांसाठी सोसायटीच्या वतीने कुठल्याही प्रकारचा खर्च पाणीपुरवठ्यासाठी करू नये असे मत उपस्थित बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केले तसेच कुठल्याही सभासदाने वैयक्तिकरित्या स्वतंत्रपणे पाण्याची टाकी बसवणे त्यावर पंप बसवणे इत्यादी गोष्टी करू नये तसेच सोसायटीने सुद्धा अशा कुठल्याही सभासदाला या प्रकारची परवानगी देऊ नये असं मत उपस्थित दोन सोडून इतर सर्व सभासदांनी व्यक्त केले. तसेच इथून पुढे सोसायटीने किंवा सोसायटीच्या व्यवस्थापन समितीने पाणीपुरवठा विषयात कुठल्याही प्रकारची तक्रार स्वीकारू नये असेही बहुसंख्या सभासदांच्या संमतीने ठरविण्यात आले.

श्री सुरेश लिमये यांनी दिनांक 14/8/2025 रोजीच्या पत्राने रीडेव्हलपमेंट कमिटी च्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून सोसायटीच्या व्यवस्थापन समितीने त्यांच्या मासिक बैठकीत तो मंजूर केला असल्याची माहिती अध्यक्ष शशांक गाजरे यांनी उपस्थित सर्व सभासदांना दिली.

श्री राहुल गणबोटे यांनी रीडेव्हलपमेंट संदर्भात सोसायटीला एक पत्र दिले असून सदर पत्रातील काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण अध्यक्ष शशांक गाजरे यांनी सभासद श्री राहुल गणबोटे यांच्याकडे मागितले त्यावर श्री गणबोटे यांनी एफएसआय तसेच त्यांच्या सध्याच्या सदनिकेचे मोजमाप याविषयी काही प्रश्न उपस्थित केले तसेच रिडेव्हलपमेंट संदर्भात मिळालेल्या ऑफर चा पुनर्विचार व्हावा अशीही मागणी केली त्यावर अध्यक्ष शशांक गाजरे व इतर सभासद श्री अभिजीत फडके सौ अनुजा फडके यांनी त्यावर आक्षेप घेतला व रिडेव्हलपमेंट ची ऑफर व विकसकाची निवड हे विषय मार्गी लागले असून त्या विषयावर पुन्हा चर्चा करणे योग्य नसल्याचे सांगितले. तसेच या संदर्भात त्यांना कुठलीही शंका किंवा प्रश्न असतील तर ते त्यांनी संस्थेचे पीएमसी आर्किटेक्ट हर्षल कवडीकर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याबरोबर चर्चा करावी असे अध्यक्ष शशांक गाजरे यांनी श्री गणबोटे यांना सांगितले.

मधु कुसुम आपटे समाज कल्याण न्यास राधिका बंगला पटवर्धन बाग येथे संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या बैठका तसेच संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा होत असतात सदर जागेचा वापर विना मोबदला करू नये यासाठी सदर मधु कुसुम आपटे समाज कल्याण न्यासाला रुपये दहा हजार देणगी म्हणून देण्यात यावी असा ठराव अध्यक्ष श्री शशांक गाजरे यांनी मांडला व त्यास उपस्थित सर्व सभासदांनी हात उंचावून मान्यता दिली.

मधु कुसुम आपटे समाज कल्याण न्यास यांना रुपये दहा हजार देणगी देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर.

सूचक: रवी मुल्लूर अनुमोदक: अभिजित फडके

शशांक गाजरे गोपाळ कुलकर्णी

अध्यक्ष सचिव